**पोलीस उप अधीक्षक कार्यालय,**
**अँन्टी करप्शन ब्युरो, जालना**
दुरध्वनी क्रमांक ०२४८२ –२२०२५२टोल फ्री क्रमांक –१०६४
dysp.acbjalna@mahapolice.gov.in, dyspacbjalana@gmail.com

**प्रेस नोट** दि. १०.०५.२०२४

**बदली झाल्यामुळे सेवापुस्तक व पगार पत्रक नगर परीषद बल्लारपुर जि. चंद्रपुर येथे पाठवण्यासाठी लाच मागणी करुन ती स्विकारणारे फायरमन आणि लाच देण्यास प्रोत्साहन देणारे मुख्याधिकारी, नगर परीषद परतुर यांना अँन्टी करप्शन ब्युरो, जालनाचे पथकाने पकडले.**

| | | |
|---|---|---|
| आलोसे यांचे नाव | – | १.अनिल वल्लभदास पारीख वय ४८ वर्ष पद– प्रभारी स्थानक पर्यवेक्षक तथा फायरमन नगर परीषद परतुर जि जालना ( वर्ग ४ )<br>२.अभिषेक अशोक परदेशी वय ३८ वर्ष पद– मुख्याधिकारी नगर परीषद, परतुर जि.जालना (वर्ग २ ) |
| गुन्हा घ ता वेळ ठिकाण | – | दि. १०.०५.२०२४ रोजी नगर परीषद कार्यालय, परतुर जि. जालना येथे. |
| **लाचेची रक्कम** | – | ५५,००० रुपये. |

तकारदार हे फायरमन या पदावर असुन त्यांची नगर परीषद परतुर जि जालना येथुन नगर परीषद बल्लारपुर जि. चंद्रपुर येथे बदली झाली असुन आलोसे कं १ अनिल पारीख याने तकारदार यांचे सन २०२३ निलंबन कालावधीतील पगार बील काढुन दिले आहे, असे म्हणुन तकारदार यांचे सेवापुस्तक व पगार पत्रक नगर परीषद बल्लारपुर जि चंद्रपुर येथे पाठविण्यासाठी आणि नगर परीषद परतुर येथील अग्नीशमन विभागातील कामकाजाचा नील रिपोर्ट पाठवण्यासाठी तकारदार यांचेकडे ६०,००० रुपये रुपये लाचेची मागणी केली, परंतु तकारदार यांची त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने तकारदार यांनी अँन्टी करप्शन ब्युरो, जालना यांचेकडे तकार केली.

सदर तकारीवरुन दिनांक ०८.०५.२०२४ रोजी तसेच दि. ०९.०५.२०२४ रोजी आलोसे यांचे लाच मागणीबाबत पडताळणी केली असता आलोसे अनिल पारीख यांनी तकारदार यांचे सेवापुस्तक व पगार पत्रक नगर परीषद बल्लारपुर जि चंद्रपुर येथे पाठविण्यासाठी आणि नगर परीषद परतुर येथील अग्नीशमन विभागातील कामकाजाचा नील रिपोर्ट पाठवण्यासाठी पंचासमक्ष ६०,००० रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ४०,००० रुपये लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य करुन सिग्नेचर कंपनीची विदेशी दारु बॉटलची मागणी केल्याचे निष्पण्ण झाले, तसेच आलोसे कं २ अभिषेक परदेशी, मुख्याधिकारी, नगर परीषद परतुर यांनी दिलेल्या लाच मागणीचे प्रोत्साहनावरुन आलोसे कं २ यांचेसाठी १५,००० रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पण्ण झाले.

त्यावरुन आज दि. १०.०५.२०२४ रोजी सापळा लावला असता आलोसे कं १ अनिल पारीख यांनी तकारदार यांचे सेवापुस्तक व पगार पत्रक नगर परीषद बल्लारपुर जि चंद्रपुर येथे पाठविण्यासाठी आणि नगर परीषद परतुर येथील अग्नीशमन विभागातील कामकाजाचा नील रिपोर्ट पाठवण्यासाठी स्वतासाठीचे ४०,००० रुपये व आलोसे कं २ अभिषेक परदेशी यांचेकरीता १५,००० रुपये असे एकुण ५५,००० रुपये लाचेची रक्कम पंचासमक्ष स्विकारली असता त्यांना पंचासमक्ष लाचेच्या रक्कमेसह अँन्टी करप्शन ब्युरो, जालनाचे पथकाने रंगेहाथ पकडले आहे. तसेच आलोसे कं १ अनिल पारीख यास तकारदार यांचे सेवापुस्तक व पगार पत्रक नगर परीषद बल्लारपुर जि चंद्रपुर येथे पाठविण्यासाठी लाच मागणी करण्यास तसेच स्विकारण्यास प्रोत्साहन देणारे आरोपी कं २ अभिषेक परदेशी यांनाही ताब्यात घेण्यात आले आहे.

आलोसे नामे १.अनिल वल्लभदास पारीख वय ४८ वर्ष पद– प्रभारी स्थानक पर्यवेक्षक तथा फायरमन नगर परीषद परतुर जि जालना (वर्ग ४) २.अभिषेक अशोक परदेशी वय ३८ वर्ष पद– मुख्याधिकारी नगर परीषद, परतुर जि.जालना (वर्ग२)यांचेविरुध्द पोलीस ठाणे कदीम जालना जि जालना येथे गुन्हा दाखल करण्याची प्रकीया सुरु आहे.

**तसेच अँन्टी करप्शन ब्युरो, जालना यांचे कडुन आवाहन करण्यात येते कि, कोणी लोकसेवक स्वत अगर इतरांमार्फत शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खासगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास ०२४८२ – २२०२५२, तसेच टोल फ्री कं १०६४ वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं. ९०११९२५५५३ व dysp.acbjalna@mahapolice.gov.in आणि dyspacbjalana@gmail.com वर संपर्क करावा.**

कार्यालय पोलीस उप-अधिक्षक अँन्टी करप्शन ब्युरो
सत्यमेव जयते
जालना

पोलीस उप-अधिक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो,जालना